Exh.325

अहमदनगर येथील मे.सिव्हील जज्ज साहेब, सिनिअर डिव्हीजन,
यांचे कोर्टात...

रे.द.नं. १५/२०१६

धनको
श्री. देवीचंद गांधी

ORDER
Seen & filed.

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.06.19 17:15:26 +0530

ऋणको
श्री. रमेशचंद्र सोनी वगैरे

**याकामी ऋणको नं. १ व २ तर्फे धनकोचे निशाणी ३१८ चे अर्जास खुलासा खालील प्रमाणे -**

१) धनकोचा अर्ज व त्यातील मजकुर सदर ऋणको यांना मान्य नाही व कबुल नाही.

२) धनको यांनी ज्या स्वरुपात अर्ज दिला आहे, या स्वरुपात टेनेबल नाही व मेन्टेनेबल नाही, सबब रदद व्हावा.

३) धनकोने सदर अर्जात "ऋणको नं.१ व २ यांची दावा मिळकतीमध्ये जी पत्र्याची शेड उभी होती ती व्यवस्थीत रित्या काढुन त्याचे मटेरिअल दावा मिळकती मध्ये एका बाजुला व्यवस्थीत ठेवलेले आहे. ऋणको यांनी अदयापावेतो सदरचे मटेरिअल नेलेले नाही. त्यामुळे त्याची योग्य ती ती विल्हेवाट लावणे जरुरीचे आहे." इत्यादी मजकुर खरा नाही व कबुल नाही.

४) वास्तविकता धनको हे कै. देवीचंद हिरालाल गांधी यांचे वारस आहात. कै. देवीचंद हिरालाल गांधी यांनी ऋणको विरुध्द अहमदनगर येथील मे.सिव्हील जज्ज साहेब सिनियर डिव्हीजन यांचे कोर्टात फायनल प्लॉट नं.१९ तेथील शेड काढून कब्जा मिळण्यासाठी रे.मु.नं.२५३/१९८९ चा दाखल केला होता. त्यामध्ये मे.कोर्टाने सदर मिळकतीवर असलेले स्ट्रक्चर प्रतिवादी यांनी काढून घेवून कब्जा देण्याचा ता.१३/१०/१९९८ रोजी हुकुमनामा दिला.

५) त्या प्रमाणे धनको यांनी सदरची दाखल केली. त्यामध्ये नि.३०३ प्रमाणे कब्जे वॉरंट काढण्यात आले. त्याप्रमाणे दि.०३/०४/२०२५ ते दि.०४/०४/२०२५ रोजी मे.कोर्टाचे बेलिफ यांनी धनको यांना सदर ठिकाणी असलेल्या ऋणको नं.१ व २ यांचे मालकीच्या उभ्या २४०० चौरस फुट, ३० फुट उंच लोखंडी पत्र्याच्या शेडसह कब्जा धनको यांना दिला. सदर मिळकतीतील स्ट्रक्चर म्हणजेच वर नमूद केलेले पत्र्याचे शेड धनको यांना मे.कोर्टाचे बेलिफ यांनी जुम्मे पत्राने सांभाळण्यासाठी धनको यांचे ताब्यात दिली होती. सदर शेड कुलुपासह बंद अवस्थेत होती, तसे धनको यांनी वेगवेगळया प्लीडींगमध्ये मान्य केलेले आहे. तसेच सदर शेडमध्ये ऋणको नं.१ व

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020000192016/truecopy/order-51.pdf
www.ecourtsindia.com

ऋणको नं.२ चे वारस तसेच कै.दाऊलाल सोनी यांचे इतर वारसांचे मालकीचे अत्यंत किंमती सामान व जिनींग प्रेसची जुनी मशिनरी इ. सामान त्या दिवशी होते.

६) असे असतांना कायदया प्रमाणे मे.कोर्टाकडून हुकुम घेवून अथवा मे.कोर्ट कमिशनर साहेब यांची नेमणुक करुन घेऊन सदर शेड जशीच्या तशी म्हणजे मे.कोर्टाचे बेलिफ यांनी धनको नं. १ ते ४ यांचे ताब्यात दिली, त्याच स्वरुपात ऋणको नं.१ व ऋणको नंबर नं.२ चे वारस तसेच कै.दाऊलाल सोनी यांचे इतर वारस मंगला मधुसुदन चांडक व राजकमल शशिकांत खटोड यांना ताब्यात दयावयास पाहिजे होते व आहे.

७) असे असतांना धनको यांनी बेकायदेशीरित्या मे.कोर्टाचा कोणताही हुकुम न घेता कायदा हातात घेवून कोणताही पंचनामा न करता सदर शेड पाडून टाकली आहे. सदर शेड मध्ये ऋणको नं.१ व २ तसेच कै. दाऊलाल सोनी यांचे इतर वारस यांचे मालकीची जुनी जिनींग प्रेसची मशिनरी व इतर किमती सामान होते. सदर मशिनरी व किमती सामान याचे सुध्दा धनको नं.१ ते ४ यांनी बेकायदेशीरपणे अफरातफर केल्याचे आढळुन येते. सदर बाब धनको यांनी त्यांचे वकीलामार्फत मे.कोर्टात सदर नि.३१८ चा अर्ज दिला त्यावेळी सदर ऋणको व इतर वारसांचे लक्षात आले. नि.३१८ चा अर्ज [illegible] केवळ धनको नं.१ ते ४ यांचा बेकायदेशीरपणा लपवण्यासाठी व मे.कोर्टाचा हुकुम घेवून मे.कोर्टाचा आश्रय व अभय घेण्यासाठी पश्चात बुध्दीने दिला आहे.

८) अशा त-हेने धनको नं.१ ते ४ यांनी मिळून ऋणको नं.१ व २ तसेच कै.दाऊलाल सोनी यांचे इतर वारस यांची मालकीची पत्रा शेड कोणताही पंचनामा न करता मे.कोर्टाचा कोणताही हुकुम नसतांना पाडून टाकुन तेथे व त्याचे आतोनात व फार मोठे नुकसान केले आहे, तसेच त्या शेड मध्ये असलेल्या जिनींग प्रेस ची मशिनरी तसेच इतर किंमती सामान यांचे अफरा तफर केले असल्याने धनको हे भारतीय न्याय संहिताचे अनेक कलमाप्रमाणे म्हणजेच कलम ६१ (१), ६१ (२), १८९ (६), २४०, २४६, ३१६ (२), ३२३, ३२४ (१), ३२४ (२) या व इतर अनेक कलमांप्रमाणे गंभीर स्वरुपाचा गुन्हा केला आहे, व त्यासाठी फौजदारी कायदयाप्रमाणे सश्रम कारावास व दंड यांची शिक्षा आहे.

९) सबब ऋणको नं.१ यांनी धनको नं.१ ते ४ यांना ॲड. गर्जे यांचे मार्फत रजिस्टर ए.डी.पोस्टाने नोटीस सुध्दा पाठविली आहे. परंतु धनको नं. २ ते ४ यांनी जाणुन बुजुन केवळ त्यांचा बेकायदेशीरपणा लपविण्यासाठी सदर नोटीस असलेले पाकीट न घेतल्याने ॲड. गर्जे यांचेकडे परत आले आहे. ऋणको नं.१ यांनी जी नोटीस धनको नं.१ ते ४ यांना पाठविली, त्याची एक प्रत सोबत दाखल केली आहे. ती सुध्दा या म्हणणेचा एक भाग समजण्यात यावी.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020000192016/truecopy/order-51.pdf

www.ecourtsindia.com

१०) अशा त-हेने धनको नं.१ ते ४ यांना ऋणको नं.१ व ऋणको नं.२ तसेच कै.दाऊलाल सोनी यांचे इतर वारस यांचे मालकीची पत्र्याची शेड फा.प्लॉट नं.१९ वर आहे त्या परिस्थितीत उभी करावी, तिचे जे काही नुकसान केले आहे, त्याचे भरपाईसह सदर शेड तसेच जिनींग प्रेसजी मशिनरी व किमती सामान होते ते तसेच जागेवर ठेवावे, असा हुकुम व्हावा. वर नमुद शेड ज्या स्वरुपात धनको नं.१ ते ४ यांना मे.कोर्टाचे बेलिफाकडून जुम्मेपत्राने ताब्यात मिळाली होती त्या स्वरुपात ऋणको नं.१ व ऋणको नं.२ तसेच कै.दाऊलाल सोनी यांचे इतर वारस यांना उभी शेड ताब्यात दयावी अन्यथा धनको नं. १ ते ४ यांनी बेकायदेशीरित्या मे.कोर्टाचा कोणताही हुकुम न घेता सदर शेडचे जे काही अपरिमित नुकसान केले व भारतीय न्याय संहितेचे कलम ६१ (१), ६१ (२), १८९ (६), २४०, २४६, ३१६ (२), ३२३, ३२४ (१), ३२४ (२) व इतर विविध कलमाप्रमाणे गंभीर स्वरुपाचा गुन्हा केला म्हणून त्यांचे विरुध्द मे. कोर्टाचे नाझर यांना योग्य ती फौजदारी कारवाई करण्याचा आदेश व्हावा.

११) अशा त-हेने धनको यांचा अर्ज पश्चात बुध्दीने केवळ त्यांचा बेकायदेशीरपणा लपविण्यासाठी दिलेला आहे, असे पाहुन दप्तरी करण्यात यावा व मे.नाझर यांना वरील प्रमाणे हुकुम करण्यात यावा.

येणे प्रमाणे खुलासा असे.

दा.ता. १९/०६/२०२५

एस.आर. बिहाणी,

पी.के.मेहेर,

के.एम. सोनी,

ॲडव्होकेटस

www.ecourtsindia.com

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020000192016/truecopy/order-51.pdf

www.ecourtsindia.com

अहमदनगर येथील मे. सिव्हील जज्ज साहेब. सि. डि. यांचे कोर्टात

Exh.326

रे.द.नं.
९५/१६

इच्छणाको
देवीचंद गांधी
आरोपी
रमेशचंद्र सोनी
व इतर

ORDER
Seen & filed.

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.06.19 17:15:53 +0530

या कामी आरोपी १ व २. तर्फे दाखल कागदपत्रे खालील प्रमाणे असे

| अ.नं. | तपशिल | तारीख |
|---|---|---|
| १). | नोटीस प्रत | ६/६/२५. |

येणे प्रमाणे दाखल कागदपत्रे असे

दा.ता. १८/६/२५.
अहमदनगर

(सही)
वकील

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020000192016/truecopy/order-51.pdf

# Ajay Garje - Advocate
# Mrs. Namrata Ajay Garje - Advocate

Samarth Corner, 2nd Floor, Hanuman Construction Building, Opp. Ahilyanagari,
Pipeline Road, Near Bhistbaug, Savedi, Ahmednagar


ता.०६/०६/२०२५

## नोटीस
## रजिस्टर पोस्टाने

प्रति,

१) **श्री. मोहन देवीचंद गांधी**
रा. डांगे गल्ली, अहमदनगर.

२) **माया दिलीप गुगळे**
रा.सोनाली ड्रेसेस, कापड बाजार, बारामती,
ता. बारामती, जि. पुणे.

३) **शारदा राजेंद्र बोरा**
रा. विनस को.ऑप.हौसिंग सोसायटी,
अॅटलस कॉप्को लि. समोर, ६/१४,
मु.पो. दापोडी, पुणे.

४) **ज्योती नितीनकुमार कटारिया**
रा. एल.आय.सी.कॉलनी, पौंड फाटा,
कोथरुड रोड, जि. पुणे.

**यांसी...**

आमचे अशिल श्री. रमेशचंद्र दाऊलाल सोनी, रा. फोर्ट, मुंबई यांनी सांगितलेल्या व दिलेलया माहितीवरुन तसेच दाखवलेल्या कागदपत्रांवरुन तुम्हांला या नोटीसीने कळविण्यात येते की,

१) तुम्ही कै. देवीचंद हिरालाल गांधी यांचे वारस आहात. कै. देवीचंद हिरालाल गांधी यांनी आमचे अशिलां विरुध्द अहमदनगर येथील मे.सिव्हील जज्ज साहेब सिनियर डिव्हीजन यांचे कोर्टात फायनल प्लॉट नं.१९ तेथील शेड काढून कब्जा मिळण्यासाठी रे.मु.नं.२५३/१९८९ चा दाखल केला होता. त्यामध्ये मे.कोर्टाने सदर मिळकतीवर असलेले स्ट्रक्चर प्रतिवादी यांनी काढून घेवून कब्जा देण्याचा ता.१३/१०/१९९८ रोजी हुकुमनामा दिला.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020000192016/truecopy/order-51.pdf

२) आपण सदर मिळकतीच्या कब्जासाठी रे.द.नं.१५/२०१६ ची दाखल केली. त्यामध्ये नि.३०३ प्रमाणे कब्जे वॉरंट काढण्यात आले. त्याप्रमाणे दि.०३/०४/२०२५ ते दि.०४/०४/२०२५ रोजी मे.कोर्टाचे बेलिफ यांनी तुम्हांस सदर ठिकाणी असलेल्या आमचे अशिलांचे मालकीच्या उभ्या २४०० चौरस फुट, ३० फुट उंच लोखंडी पत्र्याच्या शेडसह कब्जा तुम्हांला दिला. सदर मिळकतीतील स्ट्रक्चर म्हणजेच वर नमूद केलेले पत्र्याचे शेड तुम्हांला मे.कोर्टाचे बेलिफ यांनी जुम्मे पत्राने सांभाळण्यासाठी तुमचे ताब्यात दिली होती. सदर शेड कुलुपासह बंद अवस्थेत होती, तसे आपण वेगवेगळया प्लीडींगमध्ये मान्य केलेले आहे. तसेच सदर शेडमध्ये आमचे अशिलांचे, ऋणको नं.२ चे वारस तसेच कै.दाऊलाल सोनी यांचे इतर वारसांचे मालकीचे अत्यंत किंमती सामान व जिनींग प्रेसची जुनी मशिनरी इ. सामान त्या दिवशी होते.

३) असे असतांना कायदया प्रमाणे मे.कोर्टाकडून हुकुम घेवून सदर शेड जशीच्या तशी म्हणजे मे.कोर्टाचे बेलिफ यांनी तुमच्या ताब्यात दिली, त्याच स्वरुपात आमचे अशिल व ऋणको नंबर नं.२ चे वारस तसेच कै.दाऊलाल सोनी यांचे इतर वारस मंगला मधुसुदन चांडक व राजकमल शशिकांत खटोड यांना ताब्यात दयावयास पाहिजे होते व आहे.

४) असे असतांना तुम्ही मे.कोर्टाचा कोणताही हुकुम न घेता कायदा हातात घेवून कोणताही पंचनामा न करता सदर शेड पाडून टाकली आहे. सदर शेड मध्ये आमचे मालकीची जुनी जिनींग प्रेसची मशिनरी व इतर किमती सामान होते. सदर मशिनरी व किमती सामान याचे सुध्दा तुम्ही बेकायदेशीरपणे अफरातफर केल्याचे आढळुन येते. सदर बाब आपण आपले वकीलामार्फत मे.कोर्टात नि.३१८ चा अर्ज दिला त्यावेळी आमचे अशिलांचे व इतर वारसांचे लक्षात आले. नि.३१८ चा अर्ज आपण केवळ तुमचा बेकायदेशीरपणा लपवण्यासाठी व मे.कोर्टाचा हुकुम घेवून मे.कोर्टाचा आश्रय व अभय घेण्यासाठी पश्चात बुध्दीने दिला आहे.

५) अशा त-हेने सर्वांनी मिळून आमचे मालकीचे पत्रा शेड कोणताही पंचनामा न करता मे.कोर्टाचा कोणताही हुकुम नसतांना पाडून टाकुन तेथे व त्याचे आतोनात व फार मोठे नुकसान केले आहे, तसेच त्या शेड मध्ये असलेल्या जिनींग प्रेस ची मशिनरी तसेच इतर किंमती सामान यांचे अफरा तफर केले असल्याने तुम्ही भारतीय न्याय संहिताचे अनेक कलमाप्रमाणे म्हणजेच कलम ६१ (१), ६१ (२), १८९ (६), २४०, २४६, ३१६ (२), ३२३, ३२४ (१), ३२४ (२) या व इतर अनेक कलमांप्रमाणे गंभीर स्वरुपाचा गुन्हा केला आहे, व त्यासाठी फौजदारी कायदयाप्रमाणे सश्रम कारावास व दंड यांची शिक्षा आहे, याची नोंद असावी.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020000192016/truecopy/order-51.pdf

६) सबब या नोटीसीने तुम्हांस कळविण्यात येते की, ही नोटीस मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत आमचे मालकीचे पत्र्याची शेड फा.प्लॉट नं.१९ वर आहे त्या परिस्थितीत उभी करावी, तिचे जे काही नुकसान तुम्ही केले आहे, त्याचे भरपाईसह सदर शेड तसेच जिनींग प्रेसजी मशिनरी व किमती सामान होते ते तसेच जागेवर ठेवावे. वर नमुद शेड ज्या स्वरुपात तुम्हास मे.कोर्टाचे बेलिफाकडून जुम्मेपत्राने ताब्यात मिळाली होती त्या स्वरुपात आम्हास उभी शेड ताब्यात दयावी अन्यथा तुम्ही सर्वांनी सदर शेडचे जे काही अपरिमित नुकसान केले व भारतीय न्याय संहितेचे कलम ६१ (१), ६१ (२), १८९ (६), २४०, २४६, ३१६ (२), ३२३, ३२४ (१), ३२४ (२) व इतर विविध कलमाप्रमाणे गंभीर स्वरुपाचा गुन्हा केला म्हणून तुमचे सर्वांचे विरुध्द योग्य ती फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद असावी. विनाकारण नोटीस देणे भाग पाडले म्हणून या नोटीसीचा खर्च रुपये २५,०००/- तुमच्या शिरावर असे.

सदर नोटीसीची स्थळ प्रत दप्तरी ठेवून अस्सल त्यांच्या प्रती तुम्हा सर्वांना आर.पी.ए,डी.ने रवाना.

सही/-
ॲडव्होकेट

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHAH020000192016/truecopy/order-51.pdf